बुधवार दि. ०९ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘संजीवनी’चा अजब उपचार, योजनेतील रुग्णांवर १० हजारांचा भार!

## फोन पे वरून रक्कम जमा ; डॉक्टर गोयल यांनी ऑपरेशन योजनेत झाल्याचे केले स्पष्ट

**जालना । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णाचे ऑपरेशन करण्यात आले असतानाच त्याच्या नातेवाईकाकडून च्या माध्यमातून १० हजार रुपये घेतल्याची माहिती ‘युवा आदर्श’ला मिळाली आहे. जालना शहरातील संजीवनी हॉस्पिटलमध्ये हा प्रकार घडल्याचे समोर आले असून, संबंधित रक्कम नेमकी कोणत्या कारणासाठी घेण्यात आली, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने या व्यवहारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणी ‘युवा आदर्श’ने हॉस्पिटलमधील डॉक्टर गोयल यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी संबंधित रुग्णाचे ऑपरेशन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गतच झाल्याचे स्पष्ट केले. मात्र १० हजार रुपये नेमके कोणत्या कारणासाठी घेण्यात आले, याची आपल्याला माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. ही रक्कम कदाचित किंवा स्पेशल रूमच्या चार्जेससाठी घेतली असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून, याबाबत माहिती घेऊन स्पष्ट करणार असल्याचे सांगितले.

‘युवा आदर्श’ला मिळालेल्या माहितीनुसार, दोनगाव येथील केशव बडे यांच्या मुलगा शुभम बडे याचा दि. ११ रोजी अपघात झाला. पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्याला जालना येथील संजीवनी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. रुग्णाला दाखल केल्यानंतर त्याचे ऑपरेशन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत करण्यात येणार असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आल्याची माहिती आहे. मात्र त्यासाठी १० ते १२ हजार रुपये अतिरिक्त रक्कम द्यावी लागेल, असे सांगण्यात आल्याचा संबंधित नातेवाईकाचा दावा आहे. या रकमेची पावती मिळेल का, अशी विचारणा केली असता पावती मिळणार नसल्याचे सांगण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मुलाचे ऑपरेशन अत्यावश्यक असल्याने संबंधित नातेवाईकाने पैसे देण्यास तयारी दर्शवली. त्यानंतर दि. १३ रोजी योजनेच्या १३ क्रमांकाच्या खिडकीवर १२ हजार रुपये मागितले जात असल्याबाबत डॉक्टरांशी फोनवरून विचारणा करण्यात आली. त्यावेळी संबंधित व्यक्तींशी बोलून घेण्याचे सांगण्यात आल्याची माहिती आहे.



या प्रकारामुळे संशय निर्माण झाल्यानंतर संबंधित नातेवाईकाने महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काळे आणि जालना शहराध्यक्ष राहुल मैद्य रतनपारखे यांच्याशी संपर्क साधल्याचे समजते. प्रथम रुग्णाचे ऑपरेशन करून घ्या आणि रुग्णाची काळजी घ्या, असा सल्ला त्यांना देण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर डॉक्टरांशी चर्चा झाल्यानंतर हॉस्पिटलमधील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या १३ क्रमांकाच्या खिडकीजवळील कार्यालयात, कॅमेऱ्यासमोर डॉक्टरांनी दिलेल्या स्कॅनरवरून च्या माध्यमातून १० हजार रुपये भरल्याचा संबंधित नातेवाईकाचा दावा आहे. विशेष म्हणजे, या व्यवहारानंतरच मुलाचे ऑपरेशन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

या व्यवहाराचा स्क्रीनशॉट आणि अन्य संबंधित पुरावे उपलब्ध असल्याची माहिती ‘युवा आदर्श’ला मिळाली आहे.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, हॉस्पिटलमध्ये ‘ऑपरेशन मोफत झाले असून आम्हाला एकही रुपया लागलेला नाही’, अशा आशयाचे लेखी घेण्यात आल्याचा संबंधित नातेवाईकाचा दावा आहे. मात्र दुसरीकडे १० हजार रुपयांचा व्यवहार झाल्याचे सांगण्यात येत असल्याने या दोन्ही बाबींची पडताळणी होणे आवश्यक आहे.

दरम्यान, संजीवनी हॉस्पिटलमध्ये रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम आकारण्याच्या संदर्भातील हा पहिलाच प्रकार नसल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या एका प्रकरणाची माहिती ‘युवा आदर्श’ने प्रसिद्ध करून हा मुद्दा समोर आणला होता. त्या प्रकरणात रुग्णाकडून घेतलेली अतिरिक्त रक्कम हॉस्पिटल प्रशासनाकडून चेकद्वारे परत करण्यात आल्याची माहिती आहे. त्यावेळीही रुग्णाच्या नातेवाईकांकडून अतिरिक्त रक्कम घेतल्याचा मुद्दा ‘युवा आदर्श’ने उघडकीस आणला होता. त्यामुळे आता पुन्हा जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेत असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकाकडून १० हजार रुपयांचा डिजिटल व्यवहार झाल्याची माहिती समोर आल्याने या प्रकरणाची चौकशी होणे आवश्यक ठरत आहे.

‘युवा आदर्श’ने याबाबत डॉक्टर गोयल यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रुग्णाचे ऑपरेशन जन आरोग्य योजनेअंतर्गतच झाले असल्याचे स्पष्ट केले. मात्र १० हजार रुपये नेमके कशासाठी घेण्यात आले, याची आपल्याला माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले.

ही रक्कम किंवा स्पेशल रूमच्या चार्जेससाठी असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. तसेच ज्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत, तो व्यक्ती हॉस्पिटलचा कर्मचारी असल्याचे डॉक्टर गोयल यांनी सांगितले. संबंधित कर्मचाऱ्याच्या खात्यावर पैसे का स्वीकारण्यात आले, याची माहिती घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सदर कर्मचारी हा डॉक्टर बागल यांच्या जवळचा असल्याचेही डॉक्टर गोयल यांनी सांगितले असून, संपूर्ण व्यवहाराची माहिती घेऊन याबाबत स्पष्ट करता येईल, असे त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ऑपरेशन मोफत झाले असल्याचे सांगितले जात असताना त्याच रुग्णाकडून १० हजार रुपयांचा डिजिटल व्यवहार नेमका कोणत्या कारणासाठी करण्यात आला, हा या प्रकरणातील मुख्य प्रश्न आहे. ही रक्कम , स्पेशल रूम किंवा योजनेबाहेरील अन्य सेवांसाठी आकारण्यात आली होती का, याची अधिकृत नोंद काय आहे, तसेच रक्कम हॉस्पिटलच्या अधिकृत खात्यात जमा झाली की कर्मचाऱ्याच्या खात्यावर, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. उपलब्ध व्यवहार, हॉस्पिटलचे बिल, रुग्णाच्या उपचाराची कागदपत्रे आणि योजनेअंतर्गत मंजूर पॅकेज यांची पडताळणी झाल्यानंतरच या व्यवहाराचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेकडून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

# पत्रकारांच्या समस्या नियमानुसार सोडविण्यास प्राधान्य उपसंचालक प्रवीण टाके

**जालना - प्रतिनिधी**

बदलत्या माध्यमविश्वात पारंपरिक पत्रकारितेसोबतच डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढले आहे. पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. पत्रकारांच्या विविध समस्या व मागण्यांवर नियमानुसार योग्य कार्यवाही करून त्या सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी दिली.

उपसंचालक प्रवीण टाके यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल भवन येथे जालना जिल्ह्यातील पत्रकार व संपादकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अरुण



सूर्यवंशी, सहायक संचालक सुरेश पाटील यांच्यासह विविध दैनिके, साप्ताहिकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत पत्रकारांनी ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अधिस्वीकृती पत्रिका, शासकीय कार्यक्रमांचे पास, जाहिरातींचे वितरण, तसेच शासकीय बातम्या व माहितीच्या वितरणातील समन्वय याबाबत सूचना व अपेक्षा मांडल्या. यावेळी श्री. टाके यांनी पत्रकारांच्या सूचना व समस्यांची नोंद घेत संबंधित प्रकरणांची नियमानुसार तपासणी करून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. शासकीय कार्यक्रमांसाठी माध्यम प्रतिनिधींना आवश्यक समन्वय साधण्यात येईल. जाहिरातींचे वितरण शासनाच्या नियमावलीनुसार करण्यात येते. स्थानिक माध्यमांना नियमांच्या चौकटीत आवश्यक सहकार्य मिळण्यासाठीही समन्वय साधला जाईल, असेही त्यांनी सांगितले. माहिती कार्यालय आणि पत्रकार यांच्यातील संवाद अधिक सुसूत्र करण्यासाठी माहिती वितरणाची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. पत्रकारांच्या प्रश्नांवर नियमितपणे चर्चा व्हावी, यासाठी भविष्यात अशा समन्वय बैठका घेण्यात येतील, असेही श्री. टाके यांनी सांगितले. प्रारंभी पत्रकारांच्या वतीने सुयोग खेर्डेकर यांनी उपसंचालक प्रविण टाके यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

# कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा - न्यायमूर्ती संदीप शिंदे

## कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेबाबत आढावा बैठक

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक झाली. विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ पडताळणी, प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र प्रकरणांची कार्यवाही नियमानुसार करण्याबाबत न्यायमूर्ती शिंदे यांनी मार्गदर्शन केले. हैदराबाद गॅझेटच्या (पान २ वर)

# कर्जवसुलीच्या नावाखाली त्रास दिल्याचा आरोप; HDB फायनान्सविरोधात मनसेचे एसपींकडे निवेदन

## शाखा व्यवस्थापकासह वसुली कर्मचाऱ्यांकडून धमकी, शिवीगाळ व मानसिक छळ केल्याचा दावा; व्हिडिओ, कॉल रेकॉर्डिंगसह पुरावे देण्याची तयारी

**जालना । प्रतिनिधी**

कर्जवसुलीच्या नावाखाली कर्जदारांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना कथितपणे धमकी, शिवीगाळ, सार्वजनिक ठिकाणी अपमानास्पद वागणूक आणि मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जालना यांच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देण्यात आले आहे. जालना शहरातील फायनान्सच्या शाखा व्यवस्थापक विशाल बानखेडे तसेच संबंधित वसुली कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मनसेचे विलास तीकांडे यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनानुसार, संबंधित वित्तीय संस्थेचे अधिकारी व कर्मचारी कर्जवसुली करताना मनमानी पद्धतीचा अवलंब करीत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे काही कर्जदार आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे व मानसिक तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात करण्यात आलेल्या आरोपानुसार, कर्जदारांच्या घरी रात्री-अपरात्री जाऊन धमकावणे, अश्लील शिवीगाळ करणे तसेच नातेवाईक व शेजाऱ्यांसमोर त्यांचा अपमान करणे (पान २ वर)

# मनोज जरांगे पाटील यांच्यावर मध्यरात्री सलाईनद्वारे उपचार; प्रकृती स्थिर

## जिल्हा प्रशासनाची माहिती

**जालना - प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मागील दहा दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची सोमवारी मध्यरात्री जालना येथील जिल्हा रुग्णालयाच्या पथकाने त्यांची वैद्यकीय तपासणी केली व सलाईन लावून उपचार करण्यात आले.

आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

सोमवारी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास जिल्हा प्रशासन व जिल्हा रुग्णालयाच्या विशेष पथकाने त्यांची वैद्यकीय तपासणी केली. उपोषणामुळे श्री. जरांगे पाटील यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण आणि रक्तदाब कमी झाल्याचे तसेच त्यांचे वजन घटल्याचे तपासणीत आढळून आले.

श्री. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड तसेच जिल्हा प्रशासनाच्या विशेष पथकाने त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून श्री. जरांगे पाटील यांना सलाईन घेण्याची विनंती केली.

ही विनंती मान्य करत श्री. जरांगे पाटील यांनी सलाईनद्वारे उपचार घेण्यास संमती दिली. त्यानंतर त्यांना मध्यरात्री चार व आज दिवसभरात दोन सलाईन लावण्यात आल्या, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

# सृष्टी फाउंडेशन संस्थेचा चौदा वर्षांपासून जनजागृतीचा वसा

## पर्यावरण संवर्धनासाठी शाडू मातीच्या गणेशमूर्ती काळाची गरज- डॉ. प्रतिभा श्रीपत

**जालना - प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जलप्रदूषण रोखणे आणि पर्यावरणाचे संतुलन राखणे ही आपल्या सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि रासायनिक रंगांमुळे नद्या, तलाव आणि विहिरींचे पाणी दूषित होऊन जलचरांना मोठा धोका निर्माण होतो. हा धोका टाळण्यासाठी नागरिकांनी घरात पर्यावरणपूरक शाडू मातीच्याच गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करावी, असे आवाहन सृष्टी फाउंडेशनच्या डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी केले आहे. सृष्टी फाउंडेशनच्यावतीने गेल्या १४ वर्षांपासून सातत्याने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत शहरात व परिसरात व्यापक जनजागृती मोहीम राबवली जात आहे. सण-उत्सव साजरे करताना निसर्गाचा ऱ्हास होणार नाही, याची दक्षता प्रत्येकाने घेतली पाहिजे. शाडूची मूर्ती केवळ पारंपारिक आणि धार्मिकदृष्ट्या पवित्र नसून ती पाण्यात पूर्णपणे विरघळते, ज्यामुळे जलस्रोतांचे रक्षण होते. गणेशभक्तांनी घरातच बादली किंवा टबमध्ये मूर्तीचे विसर्जन करून ते पाणी बागेतील झाडांना दिले, तर पर्यावरण संवर्धनाचा खरा संदेश घराघरांत पोहोचेल, असे डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना सहजपणे आणि वाजवी दरात पर्यावरणपूरक मूर्ती मिळाव्यात, यासाठी सृष्टी फाउंडेशन दरवर्षी ‘ना नफा, ना तोटा’ या तत्त्वावर शाडू मातीच्या मूर्ती उपलब्ध करून देते. यंदाही मंठा चौफुलीवरील प्रियंका रेसिडेन्सीमध्ये अत्यंत सुबक, आकर्षक (पान २ वर)

# शाडूच्या गणेशमूर्ती वर्ल्ड रेकॉर्डबद्दल अद्विक; क्लब सदस्यांचा गणेश महासंघातर्फे सत्कार

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवणे हा मुख्य हेतू होता-राहुल अग्रवाल

**जालना - प्रतिनिधी**

अद्विक क्लबच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि शिक्षण विभाग, दिव्य मराठी यांच्या समन्वयातून शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करण्यात आल्याबद्दल श्री गणेश महासंघाच्यावतीने अधिक क्लबच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

शोला चौकातील शाळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात अद्विक क्लबचे अध्यक्ष राहुल अग्रवाल, सिद्धार्थ तवरावाला, पीयूष शाह, केदार जाधव,



शुभम अग्रवाल, सौरभ लोहिया, संस्कार जैस्वाल, दिग्विजय लोंढे, हर्ष मंत्री, ईशान अग्रवाल यांचा श्री गणेश महासंघाच्यावतीने अध्यक्ष श्लोक अग्रवाल, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, महासचिव भूषण यादव, बाबाभैया नंद, अजय अग्रवाल यांनी शाल श्रीफळ व पुष्पाहाराद्वारे सत्कार केला.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करण्यात येऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी बोलताना अद्विक क्लबचे अध्यक्ष राहुल अग्रवाल म्हणाले की, शाडू मातीपासून गणेशमूर्ती साकारण्यामागे केवळ वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा संयोजकांचा उद्देश नाही, तर पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे हा मुख्य हेतू आहे. गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि आनंदाचा उत्सव आहे.

मात्र, या उत्सवातून पर्यावरणाची हानी होऊ नये, यासाठी प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना प्राधान्य देणे गरजेचे आहे. शाडू मातीची मूर्ती ही सहज विसर्जित होऊन पर्यावरणाचे नुकसान टाळण्यास मदत करते. या उपक्रमाला नागरिक, सामाजिक संस्था आणि विविध संघटनांचा मिळालेला प्रतिसाद निश्चितच उत्साह वाढवणारा आहे. वर्ल्ड रेकॉर्डच्या माध्यमातून जालना शहराचे नाव देश-विदेशात पोहोचविण्यासोबतच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना (पान २ वर)

# संपादकीय...

## रस्ता कुठे अडला? २०-२५ किलोमीटरचा फेरा वाचवणारा मार्ग वर्षानुवर्षे रखडतोच कसा?

रस्ता हा केवळ डांबर, खडी आणि सिमेंटचा प्रश्न नसतो. रस्ता म्हणजे गावाचा शहराशी जोडलेला श्वास असतो. तो शिक्षणाची वाट असतो, रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग असतो, शेतमाल बाजारात नेण्याचे साधन असतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारी जीवनवाहिनी असतो. त्यामुळे एखादा महत्त्वाचा संपर्कमार्ग वर्षानुवर्षे रखडत असेल, तर त्याकडे केवळ 'रस्त्याचे काम प्रलंबित' म्हणून पाहणे म्हणजे त्या परिसरातील नागरिकांच्या समस्येकडे डोळेझाक करण्यासारखे आहे. जालना-परतूरदरम्यान खरपुडी, भाटेपुरी, वडीवाडी, कारला, ममदाबाद, चित्र वडगाव आणि रांजणी मार्गे जोडला जाणारा पर्यायी मार्ग तातडीने मंजूर करून काम सुरू करण्याच्या मागणीसाठी कारला येथे श्री. रामराव कोल्हे यांनी दि. ६ सप्टेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला परिसरातील नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे. २०-२५ किलोमीटरचा फेरा आणि प्रशासनाची उदासीनता नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हा मार्ग पूर्ण झाल्यास जालना-परतूर प्रवासाचे अंतर सुमारे २० ते २५ किलोमीटरने कमी होऊ शकते. हा आकडा केवळ नकाशावरील अंतराचा नाही. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांसाठी तो वेळ, इंधन आणि पैशांची बचत करणारा ठरू शकतो. एकदा विचार कराएखाद्या शेतकऱ्याला बाजारपेठेसाठी वारंवार अतिरिक्त २०-२५ किलोमीटर जावे लागत असेल, एखाद्या रुग्णाला उपचारासाठी शहरात पोहोचण्यासाठी अधिक वेळ लागत असेल किंवा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी रोज अतिरिक्त प्रवास करावा लागत असेल, तर त्या प्रत्येक फेरीची किंमत कोण मोजणार? ही किंमत सरकारच्या अर्थसंकल्पात दिसत नाही. मात्र ती सामान्य नागरिकाच्या खिशातून आणि वेळेतून दररोज वसूल होत असते. या मार्गाला राज्य मार्गाचा दर्जा मिळाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. जर हे वास्तव असेल, तर पुढचा स्वाभाविक प्रश्न असा आहे की दर्जा मिळाल्यानंतर प्रत्यक्ष काम का झाले नाही? मंजुरीचा प्रश्न आहे का? निधीचा प्रश्न आहे का? भूसंपादनाचा अडथळा आहे का? तांत्रिक मान्यता बाकी आहे का? प्रशासकीय मान्यता झालेली नाही का? की विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे फाईल एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत आहे? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे नागरिकांना मिळायला हवीत. 'प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे', 'लवकरच मंजुरी मिळेल', 'पाठपुरावा सुरू आहे', अशा सर्वसाधारण उत्तरांनी आता नागरिकांचे समाधान होणार नाही. रस्त्याची सद्यस्थिती काय आहे आणि पुढची निश्चित तारीख कोणती, हे प्रशासनाने सांगण्याची वेळ आली आहे. या मार्गाशी संबंधित गावांचा संबंध तीन विधानसभा आणि दोन लोकसभा मतदारसंघांशी येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही बाब राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. कारण हा प्रश्न एका पक्षाचा नाही आणि एका आमदाराचा किंवा खासदाराचाही नाही. मतदारसंघांच्या सीमारेषा राजकीय असतात; नागरिकांच्या समस्या मात्र त्या सीमारेषा मानत नाहीत. जालना, परतूर आणि घनसावंगी विधानसभा मतदारसंघ तसेच जालना आणि परभणी लोकसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी या प्रश्नावर एकत्र येणे अपेक्षित आहे. सभागृहात वेगवेगळ्या पक्षांच्या बाकांवर बसणे ही लोकशाहीची गरज आहे; परंतु रस्त्यासारख्या मूलभूत विकासप्रश्नावर एकत्रित पाठपुरावा करणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. 'हा माझ्या मतदारसंघाचा प्रश्न नाही' असे म्हणण्याची सोय लोकप्रतिनिधींना असू नये.

लोकशाहीमध्ये आंदोलनाला स्थान आहे. मात्र एखाद्या मूलभूत सुविधेसाठी नागरिकाला आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत असेल, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे आत्मपरीक्षण होणे आवश्यक आहे. नागरिकांनी अनेक वर्षे मागणी केली, निवेदने दिली, पाठपुरावा केला आणि त्यानंतरही प्रत्यक्ष काम सुरू झाले नाही, असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे उपोषण हा अचानक घेतलेला निर्णय नसून दीर्घकाळाच्या प्रतीक्षेतून निर्माण झालेला संताप आहे, असे मानावे लागेल. मात्र आमरण उपोषण ही परिस्थिती कोणत्याही प्रशासनासाठी अभिमानाची बाब नाही. प्रश्न सुटण्यासाठी नागरिकांनी जीव धोक्यात घालण्याची वेळ येऊ नये, हीच सक्षम प्रशासनाची खरी कसोटी आहे. आजच्या काळात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. नवीन महामार्ग, पूल, लॉजिस्टिक पार्क, औद्योगिक विकास, दळणवळणाच्या सुविधा अशा अनेक योजनांची चर्चा होते. परंतु ग्रामीण भागातील एखादा महत्त्वाचा संपर्कमार्ग वर्षानुवर्षे रखडत असेल तर विकासाचा लाभ शेवटच्या गावापर्यंत पोहोचतो आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. नागरिकांची मागणीही स्पष्ट आहेआता केवळ आश्वासन नको; प्रत्यक्ष काम सुरू झाले पाहिजे. त्यामुळे प्रशासनाने पुढील बाबी सार्वजनिक करणे गरजेचे आहे - या रस्त्याची सध्याची प्रशासकीय स्थिती काय? - रस्त्याची एकूण लांबी आणि अंदाजित खर्च किती? - प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाली आहे का? - निधी उपलब्ध आहे का? - भूसंपादन अथवा अन्य कोणते अडथळे आहेत का? - निविदा प्रक्रिया झाली आहे का? - काम सुरू करण्याची संभाव्य तारीख कोणती? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर आंदोलनाला योग्य दिशा मिळेल आणि नागरिकांमध्येही विश्वास निर्माण होईल. श्री. रामराव कोल्हे यांच्या आमरण उपोषणानंतर विविध गावांतील नागरिक साखळी उपोषण करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे. आंदोलन व्यापक होण्यापूर्वी प्रशासनाने संवाद साधणे आवश्यक आहे. आंदोलन दडपणे हा उपाय नाही आणि आश्वासन देऊन वेळ मारून नेणेही उपाय नाही. तथ्यांसह चर्चा, अधिकृत वेळापत्रक आणि प्रत्यक्ष कामाची सुरुवातहाच या प्रश्नाचा शाश्वत मार्ग आहे. हा रस्ता पूर्ण झाला तर २०-२५ किलोमीटरचा फेरा कमी होण्यासोबतच अनेक गावांचा आर्थिक आणि सामाजिक संपर्क मजबूत होऊ शकतो. शेतीमालाची वाहतूक सुलभ होईल, विद्यार्थ्यांचा प्रवास कमी होईल, आरोग्यसेवेकडे पोहोचण्याचा वेळ वाचेल आणि स्थानिक बाजारपेठांशी संपर्क वाढेल. म्हणूनच या रस्त्याकडे केवळ 'रस्ता प्रकल्प' म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा ग्रामीण विकासाचा प्रकल्प आहे. कारल्यातील उपोषणाने आता एक महत्त्वाचा प्रश्न शासन आणि लोकप्रतिनिधींसमोर ठेवला आहेवर्षानुवर्षे मागणी करूनही रस्ता का झाला नाही? या प्रश्नाचे उत्तर फक्त कागदावर नको. ते प्रत्यक्ष रस्त्यावर दिसायला हवे. आता नागरिकांना आश्वासनाची नाही, तर जेसीबीच्या पहिल्या घावाची आणि प्रत्यक्ष काम सुरू झाल्याची प्रतीक्षा आहे.

# पान १ व ४ वरुन...

### कुणबी प्रमाणपत्र...

अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच ग्राम व तालुका पातळीवरील यंत्रणांनी अर्जदारांना आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उपलब्ध नोंदींचा प्रभावी वापर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत विभागातील जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रमाणपत्र प्रक्रियेची सद्यस्थिती आणि करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

### कर्जवसुलीच्या नावाखाली...

असे प्रकार होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. कर्जदार रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी आढळल्यास त्यांना अर्वाच्य भाषेत बोलून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे. कर्जदारांना वारंवार आणि अयोग्य वेळेत फोन करून धमकावणे, अश्लील भाषेत संभाषण करणे आणि मानसिक त्रास देणे, असे आरोपही मनसेने केले आहेत. कर्जदार घरी नसताना त्यांच्या कुटुंबीयांशी, विशेषतः पत्नी व मुलांशी अपमानास्पद भाषेत बोलून भीतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा दावाही निवेदनातून करण्यात आला आहे. दरम्यान, या सर्व आरोपांची प्रशासन व पोलिसांनी निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. कर्जवसुलीच्या प्रक्रियेत संबंधित कायदे व नियामक नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याचीही तपासणी करण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

आपल्याकडे संबंधित घटनांचे व्हिडिओ फुटेज, कॉल रेकॉर्डिंग तसेच काही कर्जदारांची निवेदने व इतर कागदपत्रे उपलब्ध असल्याचा दावा मनसेने केला आहे. तपास यंत्रणेकडे हे पुरावे सादर करण्याची तयारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. फायनान्सच्या जालना शाखा व्यवस्थापकासह संबंधित वसुली कर्मचाऱ्यांविरुद्ध प्राप्त तक्रारींची तातडीने चौकशी करावी, चौकशीत आरोप तथ्यपूर्ण आढळल्यास संबंधितांविरुद्ध लागू कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कर्जवसुलीच्या नावाखाली कर्जदार किंवा त्यांच्या कुटुंबीयांना धमकी, शिवीगाळ, सार्वजनिक अपमान अथवा मानसिक किंवा शारीरिक त्रास होणार नाही, याबाबत संबंधित वित्तीय संस्थेला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कर्जदार व त्यांच्या कुटुंबीयांना कायदेशीर संरक्षण मिळावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाकडून योग्य ती कारवाई न झाल्यास सामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने लोकशाही व कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान, निवेदनात करण्यात आलेल्या आरोपांबाबत फायनान्सचे शाखा व्यवस्थापक किंवा संबंधित कर्मचाऱ्यांची बाजू उपलब्ध झाल्यास तीही वृत्तात समाविष्ट करणे आवश्यक राहणार आहे. पोलिसांच्या चौकशीनंतरच या आरोपांची वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

### सृष्टी फाउंडेशन...

आणि विविध कलात्मक रूपांमधील ७ इंच, ८ इंच व १२ इंच आकाराच्या मूर्ती उपलब्ध करण्यात आल्या आहेत. अधिक माहितीसाठी ९८३४५०४३९०, ९०२२४००९६९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून जास्तीत जास्त गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक मूर्तींची प्रतिष्ठापना करावी आणि हरित मोहिमेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन सृष्टी फाउंडेशन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

### शाडूच्या गणेशमूर्ती...

अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न आहे. भविष्यातही समाजहिताचे आणि पर्यावरण संवर्धनाचे विविध उपक्रम राबविण्याचा क्लबचा मानस आहे, असेही राहुल अग्रवाल यांनी सांगितले. याप्रसंगी श्री गणेश महासंघ आणि अधिक क्लबचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एनसीएमसी कार्ड...

असून प्रवाशांची मोठी धावपळ होत आहे.

**अतिरिक्त कपातीमुळे प्रवाशांमध्ये नाराजी**

सवलतीचे कार्ड असूनही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रोख पैसे देऊन पूर्ण तिकिटाचा प्रवास करावा लागत आहे. तसेच, रु. १०० चे रिचार्ज करताना कर स्वरूपात १ रुपया कापला जात असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे. कार्ड काढण्यासाठी २५० रुपये खर्च करावे लागल्याने आणि त्यानंतरही प्रवासात अडचणी येत असल्याने प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**आगारप्रमुखांचे स्पष्टीकरण**

''महिलांनी ५० टक्के प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्ड सोबत बाळगावे. प्रत्येक वाहकाकडे आणि तालुक्यातील बसस्थानकांसह विविध केंद्रांवर कार्ड रिचार्जची सुविधा उपलब्ध आहे. प्रवाशांनी कार्डमध्ये पुरेशी रक्कम ठेवून सहकार्य करावे.''

**योगेश गिते, आगारप्रमुख, जाफराबाद**

प्रवाशांना योग्य माहिती पुरवून सर्व्हरची समस्या त्वरित सोडवावी, अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिक आणि महिला प्रवाशांकडून केली जात आहे.

### सामनगावात...

आली आहे. यामुळे आता मनपाने उपलब्ध जागेचा प्रत्यक्ष किती वापर केला जात आहे, प्रकल्पाची क्षमता किती आहे आणि अतिरिक्त जमीन घेण्याची गरज नेमकी का भासत आहे, याबाबत ग्रामस्थांना स्पष्ट माहिती देण्याची मागणी पुढे आली आहे.

सदर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या वैधानिक, पर्यावरणीय, तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्या आहेत का, याबाबत प्रशासनाने ग्रामस्थांना स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रकल्प अधिकृतपणे कार्यान्वित झाल्याची सक्षम प्राधिकरणाची नोंद उपलब्ध होईपर्यंत संबंधित ठिकाणी नवीन घनकचरा आणणे, साठवणे अथवा टाकणे बंद करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. यामुळे घनकचरा प्रकल्पाची सद्यस्थिती, त्यास प्राप्त असलेल्या मंजुरी आणि प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामकाजाबाबत प्रशासनाला आता स्पष्ट भूमिका मांडावी लागणार आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणात घनकचरा साठविला जात आहे. कचऱ्याचे प्रमाण वाढल्यानंतर तो जाळला जात असल्याचेही वारंवार निदर्शनास येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. कचरा जाळल्यामुळे निर्माण होणारा विषारी धूर आणि दुर्गंधी सामनगाव तसेच परिसरात पसरत असून, त्याचा नागरिकांना त्रास होत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ, घशाचे विकार आणि दुर्गंधी यांसारख्या समस्या निर्माण होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि आजारी व्यक्तींवर अशा प्रदूषणाचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात कचरा साठविल्यामुळे परिसरात डास, माशा आणि अन्य रोगवाहक कीटकांचे प्रमाण वाढले असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी गावातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कचरा साठविलेल्या परिसरात तातडीने स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि रोगवाहक कीटक नियंत्रणाच्या उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. पावसाळ्यात कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून निर्माण होणारे दूषित पाणी पावसाच्या पाण्यासोबत वाहून विहिरी, तलाव, शेतजमिनी आणि अन्य जलस्रोतांमध्ये मिसळण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. असे दूषित पाणी भूजलात मिसळल्यास पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर परिणाम होण्याची तसेच शेती आणि पशुधनाच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सामनगाव हे कृषिप्रधान गाव असून बहुतांश कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे हवा, पाणी, माती किंवा भूजल प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम ग्रामस्थांच्या उपजीविकेवर होऊ शकतो. त्यामुळे पर्यावरणीय तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महानगरपालिकेने शहरातील घनकचऱ्याचे शास्त्रोक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. मात्र, कचरा साठवणे किंवा जाळण्यामुळे गावातील नागरिकांच्या आरोग्याला अथवा पर्यावरणाला धोका निर्माण होत असेल, तर प्रशासनाने त्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. ग्रामस्थांनी कचरा जाळण्याची प्रक्रिया पूर्णपणे बंद करावी, सध्या साठविलेला कचरा नियमानुसार व शास्त्रोक्त पद्धतीने हाताळावा आणि भविष्यात कचऱ्याचे अनियंत्रित साठवण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी केली आहे. सामनगाव परिसरातील पर्यावरणीय परिस्थितीबाबत ग्रामस्थांनी थेट तपासणीची मागणी केली आहे. कचरा व्यवस्थापनामुळे हवा, पाणी, माती आणि भूजलाच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे का, यासाठी सक्षम यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कचऱ्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्यास आवश्यक त्या आरोग्य तपासण्या आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशीही मागणी आहे. ग्रामस्थांनी केवळ तोंडी आश्वासन न देता महानगरपालिकेने या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती ग्रामस्थांना द्यावी, अशी मागणी केली आहे. प्रकल्पाला मिळालेल्या मंजुरी, उपलब्ध जमीन, प्रकल्पाची क्षमता, सध्या साठविलेला कचरा, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची पद्धत आणि भविष्यातील नियोजन याबाबत प्रशासनाने पारदर्शकपणे माहिती देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सामनगाव ग्रामस्थांनी अतिरिक्त जमीन देण्यास स्पष्ट नकार दिल्याने तसेच सध्याच्या कचरा व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केल्याने महानगरपालिका प्रशासनासमोर आता ग्रामस्थांच्या आक्षेपांना ठोस उत्तर देण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

एकीकडे जालना शहरातील वाढत्या घनकचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी प्रभावी प्रक्रिया प्रकल्पाची आवश्यकता आहे; तर दुसरीकडे या प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या आरोग्याला, शेतीला आणि पर्यावरणाला धोका निर्माण होऊ नये, ही त्यांची रास्त अपेक्षा आहे. त्यामुळे शहराच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न सोडविताना स्थानिक नागरिकांच्या आरोग्य व पर्यावरणाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येणार नाही.कचरा व्यवस्थापन की ग्रामस्थांच्या आरोग्याची किंमत? हा प्रश्न आता प्रशासनासमोर उभा ठाकला आहे. उपलब्ध जागेचा पूर्ण क्षमतेने वापर, आवश्यक मंजुरींची पारदर्शक माहिती, कचरा जाळण्यास प्रतिबंध, पर्यावरणीय तपासणी आणि ग्रामस्थांशी संवाद या बाबींवर मनपा प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सामनगावसह जालना शहराचे लक्ष लागले आहे. निवेदनावर राहुल राजपूत, केशव मालोदे, संदीप डोंगरे, सोपान शिंदे, गणेश भालेराव, अर्जुन पडूळ, बाबू कावळे, विजय गायकवाड, नारायण नेमाने, पुजाराम नेमाने, लंकेश्वर चिरखे आणि विष्णू सुळसुळे, लक्ष्मण शेळके यांच्यासह समस्त ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### परतूरात लिओ...

घेतला. बक्षीस वितरणासाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष महेश होलांनी, लिओ समन्वयक संदीप चव्हाण डॉक्टर भानुदास कदम शिल्पा होलांनी, मुकुंद शेपाळ ,नरपत जांगिड गुणवंत पिंपळे दिलीप नहार व पालक उपस्थित होते. साईबाबा कॉर्नर वरील अक्षय कॉटेक्स येथे संपन्न झालेल्या या उपक्रमाला सर्व शाळेच्या विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा लिओ क्लब ऑफ परतूरचा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

### परतूरमध्ये शिवसेना...

देशमुख, शाम शिंदे, गजानन मस्के, संदिप पाचारे, रवि देशमुख , ज्ञानेश्वर केवारे, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच परतूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व नागरिकांचे स्वागत करण्यात आले.

शिवसेनेच्या वतीने आयोजित या दहीहंडी महोत्सवामुळे परतूर शहरात उत्साह, एकजूट आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### राष्ट्रवादी काँग्रेस...

थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि अपेक्षा समजून घेण्यावरही भर देण्यात येत आहे.

**तळागाळापर्यंत पक्षाचे विचार पोहोचविण्याचा प्रयत्न**

प्रदेशाध्यक्ष वैशालीताई नागवडे यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहरातील महिला आघाडी अधिक सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू असल्याचे रिंकल तायड यांनी सांगितले. शहरातील अधिकाधिक महिलांना पक्षाच्या महिला आघाडीशी जोडणे, नवीन महिला कार्यकर्त्यांना संघटनेत संधी देणे, विविध भागांमध्ये संघटनेची उपस्थिती मजबूत करणे आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविणे, या उद्देशाने आगामी काळात विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महिलांचा राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील सहभाग वाढविणे आणि पक्षाच्या संघटनात्मक कार्यात महिलांना अधिकाधिक सक्रिय करणे, हा महिला आघाडीच्या आगामी कार्यक्रमांचा महत्त्वाचा भाग राहणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

**संघटन विस्तारासाठी नव्या नियोजनावर भर**

जालना शहरात महिला आघाडीची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आगामी काळात प्रभागनिहाय आणि भागनिहाय संपर्क वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून त्यांना पक्षाच्या विविध कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभागी करून घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. महिलांशी संबंधित सामाजिक प्रश्न, स्थानिक पातळीवरील समस्या आणि नागरिकांच्या अडचणी याबाबत जनजागृती करण्यासाठी महिला आघाडीच्या माध्यमातून विविध उपक्रम हाती घेण्याचा मानसही यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, शिंदखेड राजा येथे झालेल्या या भेटीत महिला आघाडीच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जालना शहरात महिला आघाडीच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती प्रदेश नेतृत्वापर्यंत पोहोचल्याने आगामी काळात संघटन विस्ताराला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी निरीक्षक प्रतिभा वैद्य, जयश्री रोकडे, भारती पदमुख आणि प्रियंका शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती.

### 3 ऑक्टोबरला ...

आयोजन करून जास्तीत जास्त लोकसहभाग वाढवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

### महिलांच्या नावावरील...

आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

सभापती संध्या देठे यांच्या निवेदनाची दखल घेत आयुक्त अंजली शर्मा यांनी कर विभागाचे कर अधीक्षक राहुल देशमुख यांना या संदर्भात सविस्तर टिप्पणी तयार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार महिलांच्या नावावरील मालमत्तांना अतिरिक्त १ टक्का करसवलत देण्याचा विषय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर ठेवण्यात आला. १४ जुलै २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सभा क्रमांक २ अन्वये या विषयावर चर्चा झाली. सभापती संध्या देठे यांनी मांडलेल्या सूचनेनुसार झालेल्या चर्चेला सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमुखाने अनुमोदन दिले. त्यानंतर महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना अतिरिक्त १ टक्का सूट देण्याच्या निर्णयाला सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाली. महिलांच्या मालमत्तांना देण्यात आलेली ही सवलत स्वतंत्रपणे देण्यात आली नसून, महापालिकेने विविध सामाजिक व पर्यावरणपूरक बाबींना प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त करसवलतींचा निर्णय घेतला आहे. यामध्ये स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, ऑनलाइन कर भरणारे मालमत्ताधारक, सौर ऊर्जेचा वापर करणारे मालमत्ताधारक आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगचा वापर करणारे मालमत्ताधारक यांना अतिरिक्त १ टक्का सूट देण्यासही सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. याच निर्णयात महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांनाही अतिरिक्त १ टक्का सूट देण्यात आली आहे. त्यामुळे महिला मालमत्ताधारकांसाठी हा निर्णय आर्थिकदृष्ट्या दिलासा देणारा ठरणार आहे. घर, जमीन किंवा इतर स्थावर मालमत्ता ही कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वाचा आधार मानली जाते. मात्र अनेक कुटुंबांमध्ये मालमत्ता खरेदी करताना ती प्रामुख्याने पुरुषांच्या नावावर केली जाते. अशा परिस्थितीत महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देण्यासाठी करसवलतीसारखे आर्थिक प्रोत्साहन उपयुक्त ठरू शकते. महापालिकेच्या या निर्णयामुळे महिलांच्या नावावर मालमत्ता खरेदी अथवा मालकी ठेवण्यास प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे. त्यातून महिलांचा मालमत्तेवरील हक्क, आर्थिक सुरक्षितता आणि कुटुंबातील निर्णयक्षमतेतील सहभाग वाढण्यास मदत होऊ शकते.

त्यामुळे केवळ करसवलत म्हणून नव्हे, तर महिला सक्षमीकरणाच्या व्यापक दृष्टिकोनातून या निर्णयाकडे पाहिले जात आहे. महिलांच्या नावावरील मालमत्तांना अतिरिक्त १ टक्का करसवलत देण्याचा निर्णय हा महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संध्या संजय देठे यांनी म्हटले आहे. महिलांना मालमत्तेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या नावावर मालमत्ता असण्याला प्रोत्साहन देण्यासाठी आपण ही मागणी केली होती. प्रशासनाने मागणीची दखल घेऊन प्रस्ताव पुढे नेला आणि सर्वसाधारण सभेने त्याला एकमुखाने मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. जालना शहरात मोठ्या संख्येने महिला मालमत्ताधारक आहेत. त्यामुळे या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ किती महिलांना मिळणार आणि महापालिकेच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये ही सवलत कोणत्या पद्धतीने लागू केली जाणार, याबाबत कर विभागाकडून अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित होणे महत्त्वाचे ठरणार आहे. महिला मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या कर विभागाकडून आवश्यक माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले. ''महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना मिळणारी ही अतिरिक्त १ टक्का करसवलत म्हणजे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला प्रोत्साहन देणारा निर्णय आहे. शहरातील अधिकाधिक महिला भगिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन सभापती संध्या संजय देठे यांनी केले आहे.

### मोठा पत्रकार...

उबाळे यांच्या दोन्ही हातांवर मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच विष्णू आंभुरे याने लाकडी काठीने त्यांच्या कंबरेवर मारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. उबाळे यांनी दोघांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांना शिवीगाळ करण्यात आली. 'तू लय मोठा पत्रकार झाला का? तू फक्त आमच्यावर गुन्हा दाखल कर, तुला जिवेच मारतो,' असे म्हणत जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. दरम्यान, रामेश्वर उबाळे यांचे वडील सोपान सिताराम उबाळे आणि राजू राठोड हे घटनास्थळी आले. त्यांनी उबाळे यांची आरोपींच्या तावडीतून सुटका केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर उबाळे यांनी परतूर पोलीस ठाण्यात हजर राहून तोंडी फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता () २०२३ मधील कलम ११८(१), ३५२, ३५१(२) आणि ३५१(३) अंतर्गत कारवाई सुरू केली आहे.या घटनेमागील नेमके कारण, पोलिसांना माहिती दिल्याचा संशय कशामुळे निर्माण झाला आणि तक्रारीतील आरोपांची वस्तुस्थिती काय आहे, याचा पोलीस तपास करणे गरजेचे आहे.

## परतूर येथे महाकाल सेना कावड यात्रेत हाजारोंच्या संख्याने भाविकांचा सहभाग

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील उड्डाणपूल येथून दि.०७, सप्टेंबर रोजी सकाळी नऊच्या दरम्यान कावड यात्रेला सुरुवात झाली होती.कावड यात्रा ही उड्डाणपूल ते प्रल्हादपूर येथील कुरुक्षेत्र महादेव मंदिर असे कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी, महाकाल सेना कावड यात्रा प्रल्हादपूर चे अध्यक्ष, शंकर एकेवार. उपाध्यक्ष, साईनाथ अग्रवाल. सचिव, मधुकर हिवाळे. सदस्य, गोपाल एकेवार.विकी हिवाळे.अमोल पिंपळे.योगेश कोयते.राज वेडेकर.गजानन घटमाळ.रोहित जैस्वाल. रितेश कांबळे.आकाश जेठे. विष्णू एकेवार.ओमप्रकाश अग्रवाल.गणेश कदम.यश पवार.यांच्या पुढाकाराने पहिल्यांदाच परतूर कराना अशी भव्य दिव्य कावड यात्रा पहाण्याची संधी मिळाली आहे.या कावड यात्रेत आकर्षण होते ते म्हणजे सर्वात मोठा नंदी आणि त्यावर बसलेले महादेव पार्वती, महादेव यांची देखणी मूर्ती, अघोरी निर्तृ, सादर करताना सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या कावड यात्रेत पाहायला मिळाला. शहरातील काही व्यावसायिक यांनी फराळाचे वाटप केले, काही ठिकाणी,दुधाचे वाटप केले.

# आदर्श शिक्षक सन्मान सोहळा २०२६ उत्साहात संपन्न

**दत्ता देशमुख**

जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्था तसेच जिजामाता महिला विकास व शिक्षण संस्था, जाफराबाद यांच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त 'आदर्श शिक्षक सन्मान सोहळा २०२६' जिजाऊ शैक्षणिक संकुल, वरुड बु. येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सौ. सुरेखाताई संजयजी लहाने तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. रविंद्र मगर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य श्री. कैलास टाले यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला.




यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. रविंद्र मगर यांनी शिक्षक कसा असावा, शिक्षणाचे महत्त्व, विद्यार्थ्यांना योग्य संस्कार व मूल्यांची जोड देऊन त्यांना कसे घडवावे, तसेच बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना सक्षम व जबाबदार नागरिक म्हणून घडविण्यात शिक्षकांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. भविष्यात विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासासाठी योगदान देण्याबरोबरच शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, कर्तव्यभावना, आत्मविश्वास व मानवतावादी दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त श्री. सुयश लहाने, तसेच श्री. रंगनाथ खेडकर, श्री. मोहनमाऊ मुळे, श्री. विलास आप्पा शिंदे, श्री. मनोहर देशमुख, श्री. राजाराम भेंडाळे, श्री. गणेश अण्णा परिहार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक दिनाचे औचित्य साधून संस्थेचे सचिव श्री. संजयजी लहाने यांच्या पुढाकारातून जाफराबाद शहरासाठी 'स्वर्ग रथ' उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत १,००१ गरजू व निराधार नागरिकांना चष्म्यांचे वाटप करण्यात येणार असून, गरज असलेल्या लाभार्थ्यांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियाही चांगल्या व तज्ज्ञ दवाखान्यात करून देण्यात येणार आहेत. शिक्षकांचा सन्मान करण्यासोबतच गरजू व निराधार नागरिकांसाठी आरोग्यविषयक उपक्रम राबवून संस्थेने शिक्षण, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवेचा आदर्श निर्माण केला आहे.

शिक्षक दिनानिमित्त आयोजित हा सोहळा समाजासाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.विजय पवार यांच्या प्रास्ताविक करून झाली, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री सचिन देशमाने यांनी केले.

# टेंभुर्णी च्या जुन्या पिढीतील, आरोग्य सेवेचा तारा, डॉक्टर गंगाबिसन काबरा यांचे निधन

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना. पूर्वाश्रमीच्या छत्रपती संभाजी नगर मधील जाफराबाद तालुक्यातील सर्वात मोठ्या गावात तील आरोग्य सेवेची निसिम सेवा करणारे डॉक्टर गंगाबीसन काबरा यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने आरोग्य सेवेतील तारा निखळला आहे. आरोग्य सेवेबरोबरच समाजसेवेचा वसा घेतलेले काबरा परिवारातील जेष्ठ सदस्य डॉक्टर गंगाबिसन काबरा हे होते. त्यांच्या जोडीला निस्सिम सेवा देणारे डॉक्टर सी आर काबरा, डॉक्टर दिगंबरराव मुळेऊर्फ डॉक्टर नाना, डॉक्टर प्रभू पाठक, डॉक्टर सय्यद बद्रुद्दीन, हे होते. ते मुस्लिम जोडीदार असतानाच एक चांगल्या दर्जाचे मित्र म्हणून गावात प्रसिद्ध होते. मापक दरात आणि समाजाला पाहिजे त्या योग्य दरामध्ये



समाजसेवेचे व्रत घेऊन आरोग्य सेवा देणारी ही जोडी त्या काळामध्ये प्रसिद्ध होती. लहान मुलांचे आजार असो मोठ्यांचे आजार असो अन्य कोणत्या प्रकारचे आजार असो किंवा आरोग्य सेवेचा सल्ला देणारे हे त्या काळातील डॉक्टर यांची सेवा टेंभुर्णीकरांसाठी कायमस्वरूपी लक्षात राहील. मित्रमंडळीमध्ये शेवटचा तारा निखळला. यांच्याशी आरोग्य सेवेच्या प्रेमाची टेंभुर्णीकरण नेहमीच आठवण काढत राहील. त्यांची आठवण नेहमीच राहील तसेच यांची सेवा ही आरोग्य सेवेतील देशभक्तीची सेवा होती. डॉक्टर गंगाबीसन काबरा हे समाजसेवेचे व्रत घेऊन पुढे आलेले असतानाच विविध धार्मिक कार्यात अध्यात्मिक कार्यात त्यांचा हिरीरीने भाग. आसायचा. १९५५ ते आस्थागायत विविध असणारे डॉक्टर गंगाबिसन काबरा आनंद पासून ते मोठ्यांपर्यंत परिचित होते. नुसतेच टेंभुर्णी गावात परिचित नव्हते तर संपूर्ण तालुक्यात जिल्ह्यात त्यांचा नावलौकिक होता.

त्या डॉक्टर मंडळींनी जुन्या काळातील डॉक्टर मंडळींनी टेंभुर्णी गावाला एक नवीन वेळात निर्माण करून दिलेली होती. सेवा म्हणजे काय असते हे त्यांनी दाखवून दिलेली आहे. च्या जानने आरोग्य सेवेची तर हानी झालीच पण एका समाजसेवकाला टेंभुर्णी नगरी मुकलेली आहे. प्रेमळ स्वभाव कसा असावा हे डॉक्टर गंगाबसन काबरा यांच्याकडून शिकलं मिळत होते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत हात जोडून नमस्कार करणारे डॉक्टर गंगावेसन काबरा होते. हस्तेवाईक पण विचारपूस करणारे आणि सर्वांची ओळख सांगणारे डॉक्टर गंगाविशंकर होते.

त्यांच्यासारखेच त्यांचे सुपुत्र चांद का बर आहे आरोग्य सेवेला वाहून घेतलेले आहे. त्यांच्या या पुण्यकर्माची टेंभुर्णी कर सदोदित आठवणीत ठेवेल. त्यांच्या पाठीमागे महेश पतसंस्थेचे चेअरमन नंदलाल काबरा, हरिभक्त परायण संतोष कुमार काबरा, जय काबरा, तसेच त्यांचा मोठा काबरा परिवार हा पाठीमागे आहे.

# श्रीमती जे.बी.के. विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीमती.जे.बी. के.विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधुन विद्यालयात स्वयंशासन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जमिर शेख सर, संचालक प्रदिप मुळे यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक कर्मचारी वर्गास पुष्पगुच्छ व पेन भेट देऊन शुभेच्छा दिल्या.त्याच बरोबर नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, सचिव. सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, जेष्ठ संचालक, माजी मुख्याध्यापक मधुकर निकम,विधिज्ञ प्रेमसुख काबरा, संचालक प्रदिप काबरा, संचालक विश्वनाथ सांगुळे, संचालक. दत्तराव देशमुख, मनोहर घोडके यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या, तसेच विद्यालयात विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिना निमित्त उत्स्फूर्तपणे शिक्षकांच्या भूमिका पार पाडल्या इ. दहावी वर्गातील विद्यार्थी युवराज साळुंखे याने मुख्याध्यापक प्राचार्य म्हणून तर प्रतिक सरोदे, व आरती कबले यांनी उपप्राचार्य म्हणून,सोनल सपकाळ हिने पर्यवेक्षक म्हणून तर कोमल ससाणे हिने क्रिडाशिक्षक म्हणून उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत वर्गात शिकवण्याचा आनंद घेतला व शिक्षकांचे कार्य व भूमिका कशी असते हे समजून घेतले.

स्वयंशासन दिन साजरा करण्यासाठी सांस्कृतिक मंडळाचे राजेंद्र जगताप, डॉ. आनंद जाधव, डॉ.अरुण आहेर, वासुदेव क्षिरसागर यांनी उत्कृष्ट नियोजन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.आनंद जाधव यांनी केले तर मुख्याध्यापक. संजय कुलकर्णी, सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख. एस. बी. बोरकर यांनी सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

# जिजाऊ स्कूलमध्ये कृष्णजन्माचा जल्लोष; दहीहंडीने रंगला उत्सव

### राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी वेधले लक्ष; सांस्कृतिक कार्यक्रमांना पालकांची उत्स्फूर्त दाद

**दत्ता देशमुख**

जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, जाफराबाद येथे गोकुळाष्टमी व दहीहंडी उत्सव उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसह पालकांची लक्षणीय उपस्थिती लाभल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुयश भैय्या लहाने उपस्थित होते. गोकुळाष्टमीनिमित्त विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या आकर्षक वेशभूषेत सहभाग घेतला. श्रीकृष्णाच्या बाललीला, राधा-कृष्ण नृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांची मने



जिंकली. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या निरागस अभिनयाने आणि उत्स्फूर्त सादरीकरणाने कार्यक्रमस्थळी आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दहीहंडी फोडण्याच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. गोविंदा आला रे आलाच्या जयघोषाने संपूर्ण शाळेचा परिसर दुमदुमून गेला. पालकांनी विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद देत त्यांचा उत्साह वाढविला. यावेळी मुख्याध्यापक योगेश शिंपी यांनी विद्यार्थ्यांना गोकुळाष्टमीचे महत्त्व सांगितले. भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, एकोपा, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे त्यांनी मार्गदर्शन केले. श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेतील चिमुकले विद्यार्थी कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरेची ओळख करून देतानाच सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक योगेश शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गोकुळाष्टमी व दहीहंडी उत्सव विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

# जवान सुधाकर इंगळे यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

**दत्ता देशमुख**

सैन्य दलात १९९१ ते २०२६ अशी ३५ वर्षे देशाची निस्वार्थ सेवा करून नुकतेच सेवानिवृत्त झालेले जाफराबाद तालुक्यातील पापळ गावचे सुपुत्र सुधाकर सखाराम इंगळे यांचा ३ सप्टेंबर रोजी पापळमध्ये भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. जवान इंगळे हे १९९१ साली भारतीय सैन्य दलात भरती झाले होते. ४ एप्रिल १९९१ पासून ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत म्हणजेच ३५ वर्षे ४ महिने त्यांनी देशाच्या विविध सीमांवर, अत्यंत कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीत देशसेवा बजावली आहे. निवृत्तीनंतर आज पहिल्यांदाच ते आपल्या मूळगावी पापळ येथे दाखल




झाल्यानंतर त्यांचे कुटुंबीय यासह पापळ येथील ग्रामस्थ, तरुणांनी त्यांची ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि फुलांचा वर्षाव करत सवाद्य मिरवणूक काढली. गावातील हनुमान मंदिरसमोरील प्रांगणात त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सुधाकर इंगळे भावूक झाले. ते म्हणाले, मी १९९१ मध्ये देशसेवेसाठी घर सोडले होते. आज २०२६ मध्ये ३५ वर्षांनंतर शरीराने निवृत्त झालो असलो, तरी मनाने आयुष्यभर सैनिकच राहणार आहे. येणाऱ्या काळात गावासह परिसरातील तरुणांनी देशसेवेसाठी पुढाकार घ्यावा, त्यासाठी मी कायम मार्गदर्शक म्हणून पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली. तर आज पापळ गावासह तालुक्याने या सोहळ्यानिमित्त माझ्यावर जे प्रेम केले, त्याचा मला सार्थ अभिमान.

## जालना तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा; शेतकऱ्यांना एकरी ५० हजारांची मदत द्या- महिला आघाडीच्या रुपम घुगे यांची मागणी

**जालना -प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील शेतकरी व महिलांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना(उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रुपम घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत जालना तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जालना तालुक्यात सध्या शेतकरी विविध संकटांना सामोरे जात असून, दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई तातडीने जाहीर करून प्रत्यक्ष खात्यावर जमा करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीचा सर्वाधिक फटका पशुधनालाही बसत असल्याने जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक त्या गावांमध्ये तातडीने पाण्याचे टँकर सुरू करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या 'ई-केवायसी प्रक्रियेबाबतही महिलांच्या अडचणी दूर करण्याची मागणी करण्यात आली. 'ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करून पात्र महिलांना योजनेचे हप्ते नियमितपणे मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. वरील सर्व मागण्या जनतेच्या हिताच्या असून, शासनाने त्याची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

# दिव्यांगांच्या मागण्यांसाठी १० सप्टेंबरला मनपाच्या सर्वसाधारण सभेवर धडक मोर्चा

### अपंग जनता दल सामाजिक संघटना आक्रमक; घरटॅक्स व मालमत्ता करात ५० टक्के सवलतीसह घरकुल, जागा आणि मानधनाची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे महानगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने १० सप्टेंबर रोजी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेवर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. दिव्यांगांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.

या संदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश शेठ राऊत आणि महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांना निवेदन सादर करून दिव्यांग बांधवांच्या मागण्या आगामी सर्वसाधारण सभेत मांडून त्यावर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १० सप्टेंबर रोजी होणार असून, या सभेत दिव्यांगांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या मागण्यांचा विषयपत्रिकेत समावेश करून त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

**करामध्ये ५० टक्के सवलतीची मागणी**

दिव्यांग नागरिकांना आर्थिक परिस्थितीमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे महानगरपालिकेने दिव्यांगांच्या घरटॅक्स तसेच मालमत्ता करामध्ये ५० टक्के सवलत द्यावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. दिव्यांग नागरिकांना कराच्या आर्थिक भारातून काही प्रमाणात दिलासा मिळाल्यास त्यांच्या कुटुंबावरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे या मागणीवर सर्वसाधारण सभेत गांभीर्याने चर्चा करून निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.




**गरजू दिव्यांगांना घरकुल, पात्रांना जागा**

महानगरपालिका हद्दीतील आर्थिकदृष्ट्या गरजू दिव्यांग नागरिकांना घरकुल उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अनेक दिव्यांग कुटुंबांकडे स्वतःचे घर नसल्याने त्यांना असुरक्षित आणि प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगावे लागत असल्याचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला आहे. घरकुलासाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना घरकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी पात्र असूनही अनेक लाभार्थी जागा अथवा अन्य आवश्यक सुविधांअभावी योजनांपासून वंचित राहतात. त्यामुळे महानगरपालिकेने याबाबत पुढाकार घ्यावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल दिव्यांगांना दरमहा मानधन**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल दिव्यांग नागरिकांसाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून दरमहा मानधन सुरू करावे, अशी महत्त्वाची मागणीही करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्तींना रोजगार, उत्पन्नाचे साधन आणि दैनंदिन गरजा भागविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळाल्यास गरजू दिव्यांगांना मोठा आधार मिळू शकतो, असे संघटनेचे म्हणणे आहे.

**शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा**

दिव्यांगांसाठी शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत.

मात्र या योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया तसेच प्रत्यक्ष लाभ मिळण्यामध्ये अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने दिव्यांगांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून पात्र लाभार्थ्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

दिव्यांग बांधवांच्या आर्थिक व सामाजिक अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांच्या मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

**सभेत निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

दरम्यान, मागील काळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास आता लोकशाही मार्गाने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. १० सप्टेंबरच्या सर्वसाधारण सभेत दिव्यांगांच्या मागण्या मांडून त्यावर ठोस निर्णय घेण्यात यावा, अन्यथा सभेबाहेर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

दिव्यांगांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी दृष्टिकोनातून न पाहता त्यांना शहरातील समान नागरिक म्हणून आवश्यक सुविधा आणि सन्मानाचे जीवन मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

या निवेदनावर राज्य कार्याध्यक्ष भाऊसाहेब दसपुते, मराठवाडा विभागीय अध्यक्ष नूर चौधरी, जिल्हाध्यक्ष राहुल मुळे आणि जिल्हाध्यक्ष सविता बोराडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# एनसीएमसी कार्ड असूनही प्रवाशांचा गोंधळ!

## कार्डमध्ये शिल्लक रक्कम नसल्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसतोय पूर्ण तिकिटाचा भुर्दंड

**दत्ता देशमुख**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी सवलतीच्या दरात प्रवास करण्यासाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) अनिवार्य केले आहे. मात्र, या कार्डबाबत पुरेशी माहिती आणि जनजागृती नसल्याने प्रवाशांमध्ये मोठा गोंधळ उडाला असून, सवलतीच्या प्रवासाला कार्डचा अडसर ठरत आहे.



**माहितीच्या अभावामुळे प्रवाशांची तारांबळ**

अनेक प्रवाशांना केवळ एनसीएमसी कार्ड दाखवून सवलतीचा प्रवास करता येईल असा समज होता. मात्र, सवलतीचे तिकीट काढण्यासाठी कार्डमध्ये पुरेशी रक्कम (बॅलन्स) असणे आवश्यक आहे. ही माहिती नसल्याने बसमध्ये चढल्यानंतर ऐनवेळी प्रवाशांना कार्डमध्ये रक्कम नसल्याचे समजते. त्यामुळे त्यांना सवलत न मिळता पूर्ण तिकिटाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे.

**सर्व्हर डाऊनची मुख्य समस्या**

ऐनवेळी कार्ड रिचार्ज करण्याचा प्रयत्न केल्यास एसटी वाहकांच्या उपकरणांमध्ये सर्व्हर डाऊनची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे प्रवाशांचे कार्ड रिचार्ज होऊ शकत नाही. परिणामी, वाहक आणि प्रवाशांमध्ये वादाच्या घटना घडत (पान २ वर)

# सामनगावात कचरा जाळण्याविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## घनकचरा प्रकल्पासाठी अतिरिक्त जमीन देण्यास ठाम विरोध; कचरा आणणे, साठवणे व जाळणे तात्काळ बंद करण्याची मनपाकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साठवून तो जाळला जात असल्याने त्यातून निर्माण होणाऱ्या धूर, दुर्गंधी आणि संभाव्य प्रदूषणाचा फटका सामनगाव ग्रामस्थांना बसत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मौजे सामनगाव येथील ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत जालना महानगरपालिका प्रशासनाकडे कचरा आणणे, साठवणे व जाळणे तात्काळ बंद करण्याची मागणी केली आहे. यापुढे घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी कोणतीही अतिरिक्त जमीन उपलब्ध करून देण्यास ग्रामस्थांचा एकमुखी व ठाम विरोध असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. उपलब्ध जागेचा योग्य, शास्त्रोक्त आणि पूर्ण क्षमतेने वापर न करता आणखी जमीन घेण्याची कार्यवाही करू नये, अशी मागणी ग्रामस्थांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. महानगरपालिकेच्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी यापूर्वीच जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, उपलब्ध जागेचा योग्य वापर न करता प्रकल्पाच्या नावाखाली सामनगाव परिसरातील आणखी जमीन घेण्याचा कोणताही प्रस्ताव असल्यास त्याला ग्रामस्थांची संमती नाही, अशी स्पष्ट भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

''उपलब्ध जागेचा योग्य वापर न करता ग्रामस्थांच्या गावाच्या परिसरातील आणखी जमीन घनकचरा प्रकल्पासाठी वापरू नये,'' अशी ठाम मागणी करण्यात (पान २ वर)

# शिक्षक हा समाज परिवर्तनाचा आरसा : प्राचार्य म्हस्के

**दत्ता देशमुख**

शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा अटक नसून सामाजिक जडणघडणीतील महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन, नवनिर्मिती आणि प्रगतिशील वेचारांची रुजवण करण्याचे नहत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करीत असतात. त्यामुळे शिक्षक हा समाज परिवर्तनाचा आरसा आहे, असे प्रतिपादन श्री रंगनाथ महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य यू. आर. म्हस्के यांनी केले.

जालना तालुक्यातील वाघ्रुळ येथील श्री रंगनाथ महाराज महाविद्यालयात शक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ने अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



कार्यक्रमास पर्यवेक्षक एम. एस. कोरडे, ना. एस. डी. लेंडीकर, प्रा.एन. एस. मोरे, ना. राऊत आदी उपस्थित होते. माजी राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर नकाश टाकला. प्रा. एन. एस. मोरे

**रंगनाथ महाराज महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात**

यांनी डॉ. राधाकृष्णन यांचे जीवनकार्य, शिक्षण क्षेत्रातील योगदान तसेच आधुनिक समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य यू. आर. म्हस्के यांनी शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच संस्कार, मूल्ये आणि सामाजिक जाणीव देण्याचे कार्य शिक्षक करतात. शिक्षकांच्या प्रयत्नातूनच सक्षम नागरिक आणि प्रगतिशील समाजाची निर्मिती होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षकांनी आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यात समाजाप्रति असलेली जबाबदारी पार पाडताना विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. के. एस. चव्हाण, आभार वसंत उगले यांनी मानले.

# जय भवानी गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**मंठा - प्रतिनिधी**

: शिवसेना पुरस्कृत जय भवानी गणेश मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी मंडळाच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

बैठकीस शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा शिव उद्योग जिल्हाध्यक्ष प्रल्हादरावजी बोराडे, तुळशीरामजी कुहीरे, नगरसेवक अचित नाना बोराडे, विष्णुपंत चव्हाण यांच्यासह मंठा शहरातील शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.



**अध्यक्षपदी नानासाहेब बोराडे,** स्वागताध्यक्षपदी कृष्णा बोराडे, तर उपाध्यक्षपदी भगवान गायकवाड, महादेव खरात, अक्षयदीप वाघमारे, इद्रिस कुरेशी, सचिन गायकवाड व निलेश शिंगणे यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्षपदी संदीप बोराडे व पप्पू शेठ दायमा, सचिवपदी मोरेश्वर बोराडे व लिंबाजी बोराडे, सहसचिवपदी नितीन मोरे व विकास घनवट यांची नियुक्ती झाली.

खजिनदारपदी फिरोज पठाण, गोविंद बोराडे, अजय खंदारे व अक्षय पंडित, तर व्यवस्थापकपदी राज पोटे, भगवान बोराडे, सचिन काळे, पप्पू शेजुळ, अमोल वीरकर, करण बोराडे व रवि डहाळे यांची निवड झाली.

बैठकीस दत्तात्रय बोराडे, योगेश गंणगे, पांडुरंग बोराडे, वीर गायकवाड, अतुल वरकड तसेच मंठा शहरातील शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. आगामी गणेशोत्सवाच्या नियोजनाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

# परतूरमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चा दहीहंडी महोत्सव उत्साहात संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला दहीहंडी महोत्सव २०२६ रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी परतूर शहरातील मार्केट कमिटी मैदानावर मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. शिवसेना जिल्हाप्रमुख, मा. महेश भैय्या नळगे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस, नितीन जेथलिया.परतुर नपचे गटनेते, गणेशनाना नळगे. बाबुराव हिवाळे.यांची उपस्थिती होती .



यावेळी दहीहंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदांचा उत्साह आणि उपस्थित नागरिकांच्या जल्लोषामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रथम पारितोषिक तब्बल ५० हजार ९९९ रुपये. दमदार कामगिरी करणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकाला हे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास नगरसेवक राजेश खंडेलवाल, शाकेर खतिब, विसम सय्यद, दिपक कदम दिपक काळे, दत्ता पाटील सुरूंग ,राहुल कदम , मधुकर पाईकराव, विजय वाणी, अशोक तनपुरे,शाम बरकुले, संदिप जगताप, बबलुशेठ बंदुकवाले , नामदेव धुमाळ ,भाऊसाहेब मुके ,शुभम पडुळ, प्रताप (पान २ वर)

# 'मोठा पत्रकार झाला का?' म्हणत वार्ताहराला मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**जालना । प्रतिनिधी**

पोलिसांना माहिती का दिली, असा जाब विचारत एका वार्ताहराला शॉकअप पाईप व लाकडी काठीने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार परतुर तालुक्यातील ब्राम्हणाथ तांडा परिसरात घडला. याप्रकरणी रामेश्वर सोपानराव उबाळे (वय ३८, रा. वाई, ता. मंठा) यांनी परतूर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी रामेश्वर उबाळे हे शेती व्यवसायासोबत वार्ताहर म्हणून काम करीत असल्याचे त्यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास ते ब्राम्हणाथ तांडा येथे असताना त्यांच्या गावातील मजीद मुसा शेख आणि विष्णू रंगनाथ आंभुरे हे दोघे त्यांच्याजवळ आले. तक्रारीनुसार, मजीद शेख याने 'तू आमची पोलिसांना का माहिती दिली?' असा जाब विचारला. त्यानंतर त्याने हातातील शॉकअप पाईपने (पान २ वर)

# परतूरात लिओ क्लबतर्फे गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळा उत्साहात संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

लिओ क्लब ऑफ परतूरच्या वतीने पर्यावरणपूरक गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. क्लबचे अध्यक्ष जयेश होलानी यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव आशिष सकलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच स्वतःच्या हाताने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा होता.



विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व कल्पकतेने सुंदर गणेशमूर्ती तयार केल्या. उत्कृष्ट कलाकृती साकारलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इव्हेंट चेअरपर्सन साक्षी दरगड व दिशा होलानी यांनी विशेष योगदान दिले. तसेच नैतिक नहार, रोहित दरगड, हर्षिता होलानी, संयुक्ति सकलेचा, कृष्णा दरगड, शगुन होलानी, गौरव राठी, देवांश होलानी, गणेश थोटे धनश्री होलानी आदित्य सोमाणी दत्ता खुले यांच्यासह लिओ क्लबच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग (पान २ वर)

# 3 ऑक्टोबरला अभिजात मराठी भाषा दिवस

## ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह

**जालना - प्रतिनिधी**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिचे संशोधन, संवर्धन आणि व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने दरवर्षी ९ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा दिवस', तर दि. ३ ते दि. ९ ऑक्टोबर या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. याबाबत मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन परिपत्रकद्वारे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने जालना जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय तसेच अन्य संस्थांनी अभिजात मराठी भाषा दिवस व सप्ताह उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील राज्यातील कार्यालये, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, खाजगी उद्योग व आस्थापना, व्यापारी बँका तसेच शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व महाविद्यालये यांचा सहभाग अपेक्षित आहे. अभिजात मराठी भाषेच्या प्राचीन साहित्याचा अभ्यास, संशोधन, संवर्धन आणि प्रसाराला चालना देतानाच मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेबाबत समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. विविध संस्था व आस्थापनांनी सप्ताहाच्या कालावधीत अभिजात मराठी भाषेशी संबंधित विविध उपक्रमांचे (पान २ वर)

# राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीचा शहरातील कामाचा अहवाल सादर

## महिला संघटन बळकटीकरणासह सामाजिक उपक्रमांचा आढावा; आगामी काळात संघटन विस्तारावर भर

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या माध्यमातून जालना शहरात राबविण्यात आलेल्या विविध संघटनात्मक, सामाजिक आणि जनसंपर्क उपक्रमांचा आढावा घेणारा कामाचा अहवाल महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष वैशालीताई नागवडे यांच्याकडे शिंदखेड राजा येथे सादर केला. या अहवालाच्या माध्यमातून शहरातील महिला आघाडीने मागील काळात केलेल्या विविध उपक्रमांची तसेच आगामी काळातील संघटनात्मक नियोजनाची माहिती प्रदेश नेतृत्वास देण्यात आली.

महिला आघाडीच्या माध्यमातून पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच महिलांशी



सातत्याने संपर्क ठेवणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील विविध भागांमध्ये महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविण्यावर विशेष भर देण्यात आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

**विविध उपक्रमांचा अहवालातून आढावा**

शहरातील महिला संघटन मजबूत करण्यासाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम, महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी साधलेला सातत्यपूर्ण संपर्क, सामाजिक कार्यक्रम तसेच सण-उत्सवांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांची माहिती रिंकल तायड यांनी प्रदेशाध्यक्ष वैशालीताई नागवडे यांना दिली. यामध्ये विशेषतः रक्षाबंधन कार्यक्रम, महिला कार्यकर्त्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेले सामाजिक उपक्रम, पक्षाच्या विचारधारेचा प्रचार-प्रसार तसेच संघटनेतील महिला पदाधिकाऱ्यांना सक्रिय करण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

महिला आघाडीच्या माध्यमातून केवळ पक्षीय कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीनेही विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. शहरातील महिलांशी (पान २ वर)

# महिलांच्या नावावरील मालमत्तांना आता अतिरिक्त १ टक्का करसवलत

## महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संध्या देठे यांच्या मागणीला यश

**जालना । प्रतिनिधी**

महिलांच्या नावावर मालमत्ता घेण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच महिला सक्षमीकरणाला आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने जालना शहर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शहरातील महिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तांना मालमत्ता करात अतिरिक्त १ टक्का सूट देण्यास महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. संध्या संजय देठे यांनी केलेल्या मागणीला या निर्णयामुळे यश मिळाले आहे. महिलांच्या नावावर मालमत्ता असण्याचे प्रमाण वाढावे आणि मालमत्ता मालकीच्या माध्यमातून



महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, या उद्देशाने सभापती संध्या देठे यांनी महापालिका प्रशासनाकडे महिलांच्या नावावरील मालमत्तांना अतिरिक्त करसवलत देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत महापालिका आयुक्त सौ. अंजली शर्मा यांनी कर विभागाला (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.